# औद्योगिक भेट अहवाल

श्री. वसंतराव नाईक कला व अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि. वाशीम येथील वाणिज्य शाखेच्या भाग 1,2,3 मधील विद्यार्थ्यांसाठी दिनांक 05 एप्रिल 2026 रोजी "शुभांगी बेकर्स प्रायव्हेट लिमिटेड (Parle-G बिस्किट निर्मिती युनिट, MIDC खामगाव)" येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना औद्योगिक उत्पादन प्रक्रिया, व्यवस्थापन प्रणाली आणि प्रत्यक्ष कार्यपद्धतीची माहिती मिळवून देणे हा होता.

या औद्योगिक भेटीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. वडगुळे यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच डॉ. एल. एस. हुरणे, डॉ. व्ही. पी. हिस्सल, प्रा.एस.ए. वाणी आणि डॉ. सुचिता माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले. या भेटीच्या यशस्वी आयोजनासाठी कंपनीतील श्री आशिष होनाळे सर यांचे विशेष सहकार्य लाभले.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना बिस्किट उत्पादन प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यात आली. गहू पीठ, साखर, तेल आणि इतर घटकांचे मिश्रण करून तयार होणाऱ्या कणकेपासून बिस्किट निर्मितीची प्रक्रिया प्रत्यक्ष दाखविण्यात आली. त्यानंतर मशीनद्वारे कणकेचे आकार देणे, बेकिंग प्रक्रिया, थंड करणे आणि पॅकिंग या सर्व टप्प्यांचे निरीक्षण विद्यार्थ्यांनी केले. आधुनिक यंत्रसामग्री, स्वयंचलित उत्पादन प्रणाली आणि गुणवत्ता नियंत्रणाच्या पद्धती यांची माहिती विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरली.

तसेच, उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता तपासणी कशी केली जाते, स्वच्छता व सुरक्षा मानके कशी पाळली जातात, याबाबतही सखोल माहिती देण्यात आली. कंपनीतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना उद्योग व्यवस्थापन, कामगार व्यवस्थापन आणि उत्पादन नियोजन याविषयी मार्गदर्शन केले.

या भेटीमुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळाला. त्यांनी वर्गात शिकलेल्या सैद्धांतिक ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग कसा होतो, हे समजले. तसेच उद्योगातील विविध करिअर संधींबाबतही विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

एकंदरीत, ही औद्योगिक भेट अत्यंत उपयुक्त, ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरली. महाविद्यालयाच्या वतीने कंपनीचे व्यवस्थापन आणि विशेषतः श्री. आशिष होनाळे सर यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. अशा प्रकारच्या भेटी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

**दिनांक: 07 एप्रिल 2026**

डॉ. एल. एस. हुरणे,　　　　　　　　　　डॉ. व्ही. पी. हिस्सल


I PARLE
Amar Shikshan Prasarak Sanstha,Mangrulpir
Shri Vasantrao Naik Arts &
Amarsing Naik Commerce College
Mangrulpir 444 403 Dist. Washim
Department of Commerce
Academic year 2025-26
Industrial Study Tour
M/s Shivangi Bekar
Parle-G Production Unit MIDC,Khamgaon
Date: 5th April. 2026 Sunday


Amar Shikshan Prasarak Sanstha,Mangrulpir
Shri Vasantrao Naik Arts &
Amarsing Naik Commerce College
Mangrulpir 444 403 Dist. Washim
Department of Commerce
Academic year 2025-26
Industrial Study Tour
M/s Shivangi Bekar
Parle-G Production Unit MIDC,Khamgaon
Date: 5th April. 2026 Sunday

# Parle Products Pvt. Ltd
# C/o. Shivangi Bakers Pvt. Ltd.

Gut No. 327, Talav Road, KHAMGAON - 444303


VISIT CO-ORDINATER
Mr. Ashish Honale
9518320149

PARLE MANAGER
Mr. Sachin N. Pathak


Date 5/4/2026

To,

The principal

Shri V.N Arts &

A.N. Commerce college Mangrulpir
Dist - Washim

**Sub: Thank You for Visiting the PARLE BISCUIT FACTORY.**

**[SHIVANGI BAKERS PVT. LTD.]**

The Students of Yours School Visited at our **Parle Biscuit Factory (Shivangi Bakers Pvt. Ltd.) Khamgaon.** We are Very Grateful for that you have given us chance to show our plant and our world class manufacturing process to Students. It was Pleasure connecting with you and your students were energetic and curious to know about Parle Company and Biscuit Manufacturing process and after the visit it was our pleasure to answer their curiosity.

Thank you for taking time to visit us and we are eagerly waiting for your next visit.

visited on
5/4/26

**Thanks & Regards**
**School Co-Ordinator**
**Ashish S. Honale**
**Mob. 9518320149**

SHIVANGI BAKERS PVT. LTD. KHAMGAON

5/4/26

# देशोन्नती


# औद्योगिक भेटीतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वाचा अनुभव

देशोन्नती वृत्तसंकलन




**मंगरुळपीर :** येथील वसंतराव नाईक कला व अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेतील भाग १, २ व ३ मधील विद्यार्थ्यांसाठी ५ एप्रिल रोजी खामगाव येथील श्घ्ञ परिसरातील 'शुभांगी बेकर्स प्रायव्हेट लिमिटेड' (बिस्किट निर्मिती युनिट) येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रिया, व्यवस्थापन प्रणाली आणि आधुनिक कार्यपद्धतीचा अनुभव देणे हा होता.

या उपक्रमाचे आयोजन संस्थेचे सचिव डॉ. अश्विन नाईक, डॉ. वर्षाताई नाईक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. वडगुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाची सखोल ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना बिस्किट निर्मिती प्रक्रियेची टप्प्याटप्प्याने सविस्तर माहिती देण्यात आली. सुरुवातीला कच्च्या मालाची निवड, त्यानंतर मिश्रण प्रक्रिया, मशीनद्वारे मोल्डिंग, बेकिंग, थंडकरण (कूलिंग) आणि अंतिम पॅकिंग या सर्व टप्प्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण विद्यार्थ्यांनी केले. अत्याधुनिक यंत्रसामग्रीद्वारे चालणारी स्वयंचलित उत्पादन प्रणाली पाहून विद्यार्थी प्रभावित झाले. यासोबतच उत्पादन प्रक्रियेतील गुणवत्ता नियंत्रणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता तपासणी कशी केली जाते, स्वच्छता व सुरक्षिततेचे नियम कसे काटेकोरपणे पाळले जातात, याबाबत कंपनीच्या तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. उद्योगातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांबद्दलही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. कंपनीतील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना उद्योग व्यवस्थापन, कामगार व्यवस्थापन, उत्पादन नियोजन आणि वेळेचे व्यवस्थापन या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले. ही भेट विद्यार्थ्यांसाठी केवळ शैक्षणिकच नव्हे तर प्रेरणादायीही ठरली. उद्योगातील शिस्त, वेळेचे महत्त्व आणि टीमवर्क यांचे मूल्य विद्यार्थ्यांना या निमित्ताने जाणवले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील डॉ. एल. एस. हुरणे, डॉ. व्ही. पी. हिस्सल, प्रा. एस. ए. वाणी व डॉ. सुचिता माने यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कंपनीच्या वतीने आशिष होनाळे यांनी दिलेल्या सहकार्यामुळे ही भेट सुरळीत आणि यशस्वी पार पडली. प्रति.


Washim Edition
Apr 9, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com